श्री राम चन्द्र मिशन®
# एकोज इंडिया
नोव्हेंबर २००८ खाजगी वितरणासाठी खंड १ अंक ६

प्रिय बंधू भगिनींनो,

एकोज इंडिया वार्तापत्राच्या सन २००८ मधील शेवटच्या अंकामध्ये आपले स्वागत. हे वर्ष एकोज इंडिया वार्तापत्राच्या चमूसाठी वार्ता संकलन आणि त्या वार्तांचे आठ प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करण्याच्या दृष्टीने परिपूर्णतेचे वर्ष होते. भाषांतर करणाऱ्या चमूच्या हार्दिक सहकार्याशिवाय या वार्तापत्राचे वेळेवर वितरण करणे शक्य झाले नसते. वार्तांकन करणारे अभ्यासी, विभागीय समन्वयक आणि विभागीय प्रमुख या सर्वांनी दाखवलेल्या प्रचंड उत्साहामुळेच सतत चढता आलेख ठेवणे शक्य झाले.

या वार्तापत्राच्या नोव्हेंबर मधील अंकात पू. गुरुदेवांच्या तामिळनाडु, चीन व आंध्रप्रदेश भेटीविषयी वृत्तांत दिलेला आहे. देशातील अनेक शाळा व महाविद्यालयांमध्ये आयोजित निबंध स्पर्धा, प्रशिक्षण कार्यक्रम, ओपन हाऊस कार्यक्रम, मुल्याधारित आध्यात्मिक शिक्षण हे या अंकामधील काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.

जानेवारी २००९ च्या अंकासाठी बातम्या पाठविण्याची शेवटची तारीख १५ डिसेंबर २००८ राहील. कृपया बातम्या व त्या प्रसंगाचा फोटो आपल्या विभागीय प्रमुख अथवा विभागीय समन्वयकांमार्फत पाठवावे.

एकोज इंडिया न्युजलेटर टीम.

## ओढ उत्पन्न करणारी मदुराई भेट



३० ऑगस्टला संध्याकाळी मदुराई आश्रमात पूज्यनीय गुरुदेवांचे त्रिचीहुन आगमन झाले. मदुराई हे चेन्नई व तिरुपूर नंतर तामिळनाडुमधील मिशनचे सर्वात मोठे केंन्द्र आहे. हा आश्रम सुमारे ३ एकर जागेवर उभा आहे. भारताच्या दक्षिण भागातून, सप्ताहाच्या शेवटी गुरुदेवांसोबत रहाण्यास आलेल्या सुमारे २००० अभ्यासींना सामावून घेणारे टिकावू ध्यानगृह देखिल येथे आहे. यावेळी अभ्यासींच्या ओळखपत्रावर छापलेला विषय होता "गुरुदेवांच्या प्रेमाचे सुख अनुभवूया" (बास्किंग इन मास्टर्स लव्ह).

रविवार, ३१ ऑगस्ट रोजी, ध्यान संपल्यानंतर पू. गुरुदेव अस्खलित व प्रवाही तमीळ भाषेत सुमारे ३० मिनिटे बोलले. त्यांचा विषय होता "कौटूंबिक जीवन व अध्यात्मिकता". ते म्हणाले की स्त्रियांनी आपल्या पतीचा हात जरुर धरला पाहीजे परंतु हृदयात मात्र केवळ गुरुदेवांनाच स्थान दिले पाहिजे. पती पत्नी हे दोघेही जर सहजमार्गात असतील तर ते खूपच चांगले आहे. आनंदी वैवाहिक जीवनासाठी आपण तीन गोष्टींना बाहेर ठेवले पाहीजे – राग, संशय आणि मत्सर. शेवटी पू. गुरुदेव म्हणाले की पृथ्वीवर घरे बांधण्याच्या मागे न लागता आपण हे ध्यानात ठेवले पाहीजे की आपले खरे घर आपल्या स्वत:च्या आतच आहे.

पू. गुरुदेवांनी आपल्या पूर्वस्मृतींना उजाळा देत ज्या ठिकाणी त्यांचे लग्न झाले होते त्या लग्नघरास भेट दिली तसेच त्यांनी जेथे पूर्वी सत्संग होत असे त्या वालमजी मेन्शनला देखिल भेट दिली. पू. गुरुदेवांनी टी.टी.के. मध्ये असताना या ठिकाणांना दिलेल्या भेटींविषयी जेव्हा जुन्या आठवणी सांगीतल्या तेव्हा संपुर्ण वातावरण भारुन गेले होते.

त्यांनी विरुधनगर जवळील चिन्नवल्लीकूलम आश्रमास देखील भेट दिली व तेथील स्थानिक अभ्यासींसमवेत काही वेळ मजेत घालवला. ते म्हणाले "मी जेव्हाही येथे येतो मला खुप छान झोप येते". गुरुदेवांनी बाबूजी महाराजांच्या विरुधनगर भेटीच्यावेळच्या जुन्या छायाचित्रांचा संग्रह देखिल बघितला आणि मोठ्या ग्रुप फोटोमधील अभ्यासींना देखील त्यांनी बरोबर ओळखले. त्यांना हे ऐकून खूप वाईट वाटले की विरुधनगरमधील टी.टी.के. मधील त्यांचे बहुतेक सर्व सहकारी स्वर्गवासी झाले आहेत.

नेहमीप्रमाणेच गुरुदेवांनी रोज त्यांना भेटायला येणाऱ्या अभ्यासींना भेटण्यासाठी वेळ दिला व त्यांच्या व्यक्तिगत समस्या व अडचणी जाणून घेतल्या. दि. ३ सप्टेंबर रोजी गुरुदेव परत चेन्नईला रवाना झाले.








## पू. गुरुदेवांची प्रथम ऐतिहासिक चीन भेट (१६ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २००८)

पू. गुरुदेवांचे शांघायच्या पुडॉन्ग विमानतळावर आगमन झाले आणि "ईमीग्रेशन क्लियरन्स" नंतर कारमध्ये बसताना ते म्हणाले "अखेर आपण चीनला पोहोचलो". स्थानिक अभ्यासी आणि परदेशातील चिनी अभ्यासी यांनी मिळून ग्रीन कोर्ट येथे (जेथे गुरुदेवांचे वास्तव्य होते) स्वागत समारंभाचे आयोजन केले होते. गुरुदेवांनी लगेचचं "चला आतिषबाजी करुया व बिजींग ऑलंपिक प्रमाणे एक ज्योत पेटवू या" असे म्हणत सर्वांना ध्यानासाठी आमंत्रित केले. त्यांनी सर्व उपस्थित अभ्यासीच आहेत की नाहीत याची विचारणा केली व लगेचचं म्हणाले की त्याने काहीही फरक पडणार नाही कारण ते तसेही संपूर्ण चीनला प्राणाहुती देणार आहेत.


गुरुदेवांनी एका तीन दिवसीय सेमीनारला देखील मार्गदर्शन केले. सेमीनारचा विषय होता "हृदयाची भाषा". त्यांनी चाळीसहुन अधिक अभ्यासींसमवेत स्थानिक पर्यटन व खरेदीचा देखील आनंद घेतला. काहीवेळेस ते जेवणानंतर अभ्यासींशी संवाद साधत असत. चीन विषयी बोलताना त्यांनी चिनी अभ्यासींना आशिर्वाद दिला आणि आत्ता पेरलेल्या बियाण्यांचे भविष्यामध्ये चांगले भरघोस पिक येइल अशी आशा व्यक्त केली. ते विशेषकरुन म्हणाले की "शान सी" राज्यातील "क्सिआन" शहरात सहजमार्गाचा प्रसार होतो आहे.

एस.आर.सी.एम

# एकोज इंडिया

नोव्हेंबर २००८ खाजगी वितरणासाठी खंड १ अंक ६





चीन मधील लोकांसाठी आयोजित विशेष सेमीनारमध्ये दिलेल्या संदेशात गुरुदेव म्हणाले –

> आपण स्वत:ला देश, धर्म आदी गोष्टींनी विभागले आहे. ईश्वराने हा फरक निर्माण केलेला नाही. ईश्वराने मानव व प्रेम याशिवाय काहीही निर्माण केलेले नाही.
>
> आपल्याकडुन सर्वप्रथम मानव बणण्याची अपेक्षा केली जाते व त्यानंतर इतरांना मानव बनण्यास मदत करण्याची अपेक्षा केली जाते.
>
> आम्ही येथे तुमच्यासमोर एक मार्ग घेऊन आलेलो आहोत. संपूर्ण आयुष्य त्या मार्गावरुन चालण्यासाठी व आपले आंतरिक स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी तुमची मदत करण्यास आलेलो आहोत. सहजमार्ग हा स्वातंत्र्याचा मार्ग आहे.

"आपणांस खरोखरीच त्यांची सेवा करण्याची इच्छा आहे काय?
त्यासाठी तीन गोष्टी आवश्यक आहेत (CAD)

C वचनबद्धता / बांधीलकी (Committment)
A लक्ष / वापर (Application)
D निश्चय / करारीपणा (Determination)

पा. राजागोपालाचारी, चीन २००८

## पू. गुरुदेवांची हैद्राबाद भेट






११ ऑक्टोबर २००८ रोजी पू. गुरुदेवांचे चेन्नई येथुन आगमन झाले. आश्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारापासुन ते गुरुदेवांच्या कॉटेज पर्यंत शिस्तबध्दरित्या उभ्या असलेल्या हजारो अभ्यासींनी गुरुदेवांचे स्वागत केले. पू. गुरुदेव स्वत: सायंकालीन सत्संगासाठी ध्यानगृहात उपस्थित होते.

या भेटीदरम्यान गुरुदेवांनी आंध्रप्रदेशातील विविध भागातून आलेल्या अभ्यासींची भेट घेतली आणि मिशनच्या अनेक प्रशासकीय बाबींची चर्चा केली. त्यांनी ४ अभ्यासींना प्रशिक्षक म्हणून काम करण्यास अनुमती दिली व संपूर्णवेळ गुरुदेव आनंदी व तणावरहीत दिसत होते.

रविवारी १२ तारखेला सकाळच्या पूजेनंतर गुरुदेवांद्वारे ३ लग्ने साकार झाली व त्यानंतर गुरुदेवांनी भाषण दिले ज्याची सुरुवात पुढील प्रमाणे होती – "माझ्या कामाची दोन प्रमुख वैशीष्ट्ये आहेत १: मी तेवढेच काम करु शकतो जे करण्यासाठी माझ्या गुरुदेवांची परवानगी आहे. २: त्यांनी जे काम करण्यासाठी मला परवानगी दिली आहे ते करण्यासाठी माझ्याकडे पूरेसे बळ व ईच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. आणी तिसरे व सर्वात महत्वाचे म्हणजे ते काम करण्यासाठी व त्याच्या फलप्राप्तीसाठी आपले सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. या सहकार्याचा अर्थ असा की सहजमार्गातील दहा नियमांच्या अधीन राहुन जीवन जगणे, नियमित साधना, अंतर्गत व बाह्य शिस्तबध्दता, भौतिक व अध्यात्मिक शिस्तबध्दता, घरी व बाह्यजगतातील शिस्त, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तुमचे विचार नियमित करण्यास लागणारी शिस्तबध्दता, कारण यातच सर्व समस्यांचे मूळ दडलेले आहे.

रविवारी दुपारी प्रशिक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली ज्यामध्ये सुमारे १२५ प्रशिक्षकांनी भाग घेतला जे मुख्यत: आंध्रप्रदेशमधून आलेले होते. या सर्व प्रशिक्षकांना गुरुदेवांच्या ८ ऑक्टोंबरच्या संदेशावर व सकाळी दिलेल्या भाषणावर मनन करण्याची संधी मिळाली. त्यानंतर गुरुदेवांनी सर्व प्रशिक्षकांना संबोधीत केले व सिटींग दिली. गुरुदेव सायंकालीन सत्संगासाठी ऊपस्थित होते त्यावेळेस त्यांनी आपण पुर्वनिर्धारित कार्यक्रमापेक्षा एक दिवस आधीच जाणार असल्याचे जाहीर केले. ते म्हणाले की त्यांनी त्यांचे काम लवकर संपवले आहे.

सोमवारी गुरुदेव डोमलगोडा योगाश्रमासाठी रवाना झाले. या आश्रमास ते सुमारे ५ वर्षानंतर भेट देत होते. गुरुदेवांनी सायंकालीन सत्संगानंतर रात्री आश्रमातच मुक्काम केला व मंगळवारी सकाळी गुरुदेव कोलकाता येथे रवाना झाले.





## नीती आणि नीतीशास्त्र

### अन्ना विद्यापीठ – चेन्नई.

२१ ऑगस्ट २००८ रोजी अन्ना विद्यापीठ चेन्नई परिसरातील प्रिंटींग टेक्नॉलॉजी विभागात १२५ अभियांत्रीकी विद्यार्थी व शाखेतील ६ प्राध्यापक यांच्याकरिता एक भाषण व दोन तासाच्या संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. मिशनचे संयुक्त सचिव बंधू ए. पी. दुराई यांनी या प्रसंगी दिलेल्या भाषणाचा विषय होता "नियती वा उद्दीष्टाकडे जाणारा मार्ग हा मुल्ये आणि नीतीशास्त्र यांनी व्यापलेला आहे". या विषयावरील सहजमार्गाचा दृष्टीकोन व गुरुदेवांचे निरीक्षण त्यांनी यावेळी प्रस्तुत केले. "नीतीमुल्ये ही तुमच्यासाठी व इतरांसाठी असतात, नीतीशास्त्र हे तुम्हाला प्रभावीत करते". "अशा गोष्टी करु नका ज्या तुमच्या शारीरीक मानसिक व अध्यात्मिक संरचनेस हानी पोहोचवतात".

बऱ्याच विद्यार्थ्यांनी मास्टर व मिशन विषयी प्रश्न विचारले तर त्यापैकी काहींनी बाबूजी मेमोरिअल आश्रमास भेट देण्याविषयी स्वारस्य दाखवले. नवीन अभ्यासी व वरिष्ठ प्राध्यापक श्री. के. विपेंन्द्रन यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.





## प्रकाशन – नवीन वितरण



तमीळ भाषेत दोन भाषणे असलेली एक डी. व्ही. डी. या दिवाळीते प्रसिद्ध करण्यात आली.

तिरुपूर येथे ध्यानगृहाचे उदघाटन – ०२ मार्च २००८ – २५ मिनीटे
मदुराई येथील संदेश – ३१ ऑगस्ट २००८ – २० मिनीटे.

## आश्रय – जेष्ठ नागरिकांसाठीचे घर

पू. गुरुदेवांच्या आशिर्वादाने, ईरोड येथे सुमारे २५० अभ्यासी – " 'आश्रय' – जेष्ठ नागरिकांसाठीचे घर" – च्या उदघाटन प्रसंगी उपस्थित होते. हे घर एक अभ्यासी बंधुच्या पुढाकाराने स्थापन झाले आहे. सकाळी ७ वाजता, तिरुपूरहून काही अभ्यासींच्या आगमनाबरोबरच समारोहास सुरवात झाली. सत्संग झाल्यावर काही अभ्यासींनी सहजमार्गाचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि जेष्ठ नागरिकांची काळजी या विषयावर आपले विचार व्यक्त केले. सहभागी झालेले सर्वजण लक्षपूर्वक ऐकत होते तसेच आम्हासर्वांना चांगल्या वातावरणाचा व गुरुदेवांच्या आशिर्वादाचा अनुभव येत होता.



## आंतरराष्ट्रीय शांतता दिवस



२१ सप्टेंबर रोजी जगातील सर्व केंद्रांमध्ये प्रार्थनासभा आयोजित करुन संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा करण्यात आला. गुजरातमध्ये बुधवार सत्संगाच्यावेळी अभ्यासींच्या मित्रांना व इतर सहकाऱ्यांनासुध्दा यावेळी आमंत्रित करण्यात आले होते. प्रार्थनेनंतर पू. गुरुदेवांनी लखनऊ येथे २३ जुलै रोजी दिलेले इंग्रजीमधील भाषण आमंत्रितांना ऐकवण्यात आले ज्यामधून सहजमार्गाचा सारांश त्यांना कळला.

## मंगळूर – कर्नाटक

२४ ऑगस्ट रोजी बंधू मोहनदास हेगडे यांनी मंगळूर केंद्रावर प्रगत प्रशिक्षण केंद्राचे आयोजन केले. याचा मुख्य उद्देश सहजमार्गाच्या योग्य आकलनाद्वारे अभ्यासींची आध्यात्मिक प्रगती साधणे व गुरुदेवांकडून मिळणाऱ्या निरंतर आध्यात्मिक मदतीचा स्वीकार करण्यास प्रोत्साहित करणे हा होता.

यामध्ये मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे सहजमार्गाच्या मूल तत्वाचे स्पष्टीकरण जे जुन्या व नवीन दोन्ही अभ्यासींना उपयुक्त ठरले. भंडारा कार्यक्रमांमध्ये उपस्थित रहाणे कसे आवश्यक आहे, गुरुदेवांप्रती प्रेम कसे विकसीत करावे व प्रार्थनेची उपयुक्तता यावर मार्गदर्शन करण्यात आले. गुरुदेवांच्या दुबई भेटीच्यावेळी अभ्यासींबरोबर झालेल्या संभाषणाची चित्रफीत दाखवण्यात आली ज्यामध्ये त्यांनी "अवस्था" (कंडिशन) कशी उत्पन्न करावी याबाबत मार्गदर्शन केले आहे. ज्यावेळेस गुरुदेव अभ्यासींमध्ये आध्यात्मिक अवस्था उत्पन्न करतात त्यावेळी अभ्यासींनी त्या अवस्थेचे पुन: पुन: स्मरण केले पाहिजे व ती अवस्था जास्तीत जास्त काळ टिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## कोडाईकनाल – तामिळनाडु

या थंड हवेच्या ठिकाणी सहजमार्गाचा प्रसार करण्याचे मिशनचे कार्य आपल्या मदुराई केन्द्राचे अभ्यासी व कोडाईकनाल येथील स्थानिक अभ्यासी यांच्या द्वारे सतत सुरु आहे.

१२ सप्टेंबर रोजी वृंदावन पब्लिक स्कूल येथे २० शिक्षकांसाठी सहजमार्गावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाते समाविष्ट केलेल्या विषयांमध्ये संरचना, मिशन, मास्टर, पद्धती, व दृष्य स्वरुपातील फायदे होते. काही शिक्षकांनी सहजमार्ग स्वीकारण्यामध्ये स्वारस्य दाखवले. मुख्याध्यापक श्री. मुन्नासिंग यांच्याकडून उत्कृष्ठ प्रकारचे सहकार्य मिळाले व त्यांनी शिक्षकांसाठी मुल्याधिष्ठीत शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यास संमती दिली.

ग्रामीण विकासासाठी काम करणारी संस्था "श्री जयेंद्र सरस्वती कॉलेज" येथे दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रथम दिवशी म्हणजेच २६ सप्टेंबर २००८ रोजी तेथील १० शिक्षक सहभागी झाले होते. दुसऱ्या दिवशी सुमारे १०० विद्यार्थ्यांनी "सहजमार्ग साधना पध्दतीद्वारे ध्यान" या विषयावर आयोजित सत्रास हजेरी लावली यापैकी १५ विद्यार्थ्यांनी साधना सुरु करण्याची इच्छा प्रकट केली. हा कार्यक्रम तेथील स्थानिक अभ्यासींच्या सहकार्याने बंधु प्रसाद व व्ही.सी. राव यांनी आयोजित केला होता.



## प्रशिक्षण कार्यक्रम

### पानशेत रिट्रीट सेंटर – पूणे

४ व ५ ऑक्टोंबर २००८ रोजी पानशेत रिट्रीट सेंटर पूणे येथे झालेल्या महाराष्ट्र एस. आर. सी. एम. युवा मेळाव्याची मुख्य संकल्पना होती "गुरुदेवांशी सामीप्य वाढवणे"

रिट्रीट सेंटरचे शांत व प्रसन्न वातावरण हे या कार्यक्रमामधे सहभागी होणाऱ्या ४० अभ्यासी व त्यांच्या मार्गदर्शकांच्या समुहासाठी आदर्श असे वातावरण होते. या कार्यक्रमाचा विषय मुख्यत: गुरुदेवांशी असलेले संबंध व सहजमार्गाचे दूत म्हणुन युवकांची भूमिका या संकल्पनेभोवती गुंफला गेला होता. याशिवाय सहजमार्ग साधनापद्धतीच्या मुलतत्वांचा देखिल यामध्ये अंतर्भाव होता. येथे होणाऱ्या भाषणांना सिनेमा, प्रश्नोत्तरे, खेळ, आकर्षक पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन्स, गुरुदेवांच्या भाषणामधील उतारे आणि अभ्यासीद्वारे सादर केलेले सुश्राव्य संगीत या सगळ्या गोष्टींची जोड मिळाली होती. जेवण व रहाण्याची उत्तम व्यवस्था, पुण्याच्यो अभ्यासींनी घेतलेली काळजी व त्या द्वारे व्यक्त झालेले त्यांचे प्रेम यामुळे हा कार्यक्रम सर्व उपस्थितांसाठी संस्मरणीय ठरला.

### गाझीयाबाद – उ. प्र.

२८ सप्टेंबर २००८ रोजी आयोजित या कार्यक्रमात सहजमार्गात २ वर्षापेक्षा कमी काळ असणाऱ्या सुमारे ५० अभ्यासींनी भाग घेतला. हे सर्व अभ्यासी गाझीयाबाद, साहीबाबाद व नोईडा येथील होते. या कार्यक्रमात पुस्तकी शिक्षणापेक्षा अचुक व नियमित साधना करण्याच्या मुद्यावर अधिक भर देण्यात आला.

सहभागी अभ्यासींना साधनेचे मूलतत्व सोपे व परिणामकारकरित्या समजावून सांगण्यात आले. सतत स्मरण व सफाई विषयीच्या अशा अनेक शंकांचे निरसन करण्यात आले ज्या पुस्तके वाचून सुद्धा शिल्लक होत्या. अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमांची संख्या वाढविली जावी अशी अपेक्षा नवीन अभ्यासींकडुन व्यक्त करण्यात आली.

### जम्मू

२६ सप्टेंबर व ९ ऑक्टोंबर रोजी २ ओपन हाउस कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पहिला कार्यक्रम जेनेसिस इन्स्टीव्यूट ऑफ कॉपिटेटीव्ह स्टडीज ( आय. ए. एस. करु इच्छिणाऱ्यांची संस्था) येथे संपन्न झाला. ज्यामध्ये २१ ते २५ वयोगटातील ३५ विद्यार्थी सामील झाले होते. त्यांच्यासमोर सहजमार्ग 'समतोल जीवनासाठी राजमार्ग' – या स्वरुपात सादर केले गेले.

दुसरा कार्यक्रम जम्मूपासुन ९० कि.मी. दुर ज्योतीपूर शहरात ४० ते ४५ वयोगटातील एन. एच. पी. सी. च्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला. येथे सहजमार्गास 'अध्यात्मिकतेमधील एक नवीन किरण' म्हणून पेश करण्यात आले.

दोन्ही कार्यक्रमांना खुपच चांगला प्रतिसाद लाभला. सहभागींपैकी १५ जणांनी साधना सुरु करण्यास अनुकूलता दर्शविली.



### हैद्राबाद – आं. प्र.

२८ सप्टेंबर २००८ रोजी एस. आर. नगर येथील ध्यानकेंद्रामध्ये १२० नवीन अभ्यासींसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मागील एक वर्षात ज्यांनी सहजमार्गात प्रवेश केला आहे अशा अभ्यासींसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सहभागींच्या मते वर्गामध्ये शिकवण्याच्या नियमित पद्धतीपेक्षा परस्पर संवादाचा हा प्रकार जास्त चांगला होता.

'सहजमार्गात आपले स्वागत' या पुस्तिकेमधील विषयांनी या कार्यक्रमामध्ये होणाऱ्या चर्चेस योग्य ती दिशा दिली. सर्व विषय अतिशय गंभीरपणे व विस्तृतपणे अतिशय मोकळ्या वातावरणात चर्चीले गेले. येथे अभ्यासींना स्वत:ला व्यक्त करण्यासाठी आणि इतरांशी संवाद साधण्यासाठी पूर्णत: मोकळीक होती.

कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी गुरुदेवांचे "सहजमार्ग साधनापद्धती" (द प्रॅक्टिस ऑफ़ सहजमार्ग) हे भाषण ऐकवले गेले.

### तिनसुकीया



१९ सप्टेंबर २००८ रोजी तिनसुकीया आश्रमात ६४ अभ्यासींसाठी एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच दिब्रुगड केंद्रामध्ये देखील १९ अभ्यासींसाठी असाच एक कार्यक्रम आयोजित केला गेला.

बंधु असोके सेनगुप्तांद्वारे एक "स्लाईड प्रेझेंटेशन" देण्यात आले. गुरुदेवांच्या भाषणाचा संदर्भ देऊन ते म्हणाले "गुरुदेवांपुढे संपूर्ण समर्पण करणे खूपच कठीण आहे. परंतु त्यांच्या कामासाठी स्वत:ला समर्पित करुन आपण गुरुदेवांद्वारे आपले त्यांच्या समोर समर्पण करुन घेऊ शकतो, जे की जास्त सोपे आहे".

### बीदर – कर्नाटक येथील एक दिवसीय कार्यक्रम

रविवार २१ सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे संचलन आपल्या मिशनचे संयुक्त सचीव बंधु ए. पी. दुराई, उत्तर कर्नाटकचे विभागीय प्रमुख बंधु राजु काशमपूरकर यांनी केले तर बीदर, भालकी, थानाकूशनूर आणी गुलबर्गा येथील सुमारे ५० अभ्यासी या कार्यक्रमास उपस्थित होते.

सकाळच्या सत्संगानंतर एका चर्चासत्राचे आयोजन केले गेले ज्यामध्ये सर्व अभ्यासींनी सक्रीय सहभाग घेतला. या चर्चासत्राचा विषय होता "आपल्या केन्द्रामध्ये मिशनच्या विकासाकरिता करावयाचे योगदान". अनेक अभ्यासींनी यावेळी आपले विचार व्यक्त केले ज्यामध्ये ओपन हाउस कार्यक्रमाचे व घरगुती कार्यक्रमाचे आयोजन यापासुन तर स्वत:लाच अशाप्रकारे विकसित करणे की आपण स्वत:लाच मिशनचे आदर्श व्यक्ती म्हणुन सादर करु शकु यासारखे विचार होते. दुपारी गुरुदेवांच्या "हबल – बबल" मधील संदेश दाखवले गेले. सर्वार्थाने हे एक उत्कृष्ट असे परस्पर संवादाचे सत्र ठरले, एक असा दिवस जेथे सर्वार्थानेखुप काही शिकावयास मिळाले व ज्यामुळे अभ्यासींमध्ये त्यांची साधना अधिक जोमाने व नियमित करण्यासाठी एक नवीन उत्साह निर्माण झाला.



## हैद्राबाद येथे मुल्याधारित आध्यात्मिक शिक्षण पद्धतीस वाढता प्रतिसाद

हैद्राबाद व्हि. बी. एस. ई. केन्द्र, अध्यात्मिक मुल्यांच्या साधने दरम्यान अभ्यासी तसेच विद्यार्थीगण या दोन्हीही घटकांच्या शिक्षणाकडे सतत लक्ष पुरवित आहे.

२२ ऑगस्ट रोजी ओस्मानीया वैद्यकिय महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक अडीच तासाचे सत्र "यथार्थ स्वरुपातील जीवन" व "ध्येय निश्चिती" या विषयांवर आयोजित करण्यात आले होते. माहितीपूर्ण, प्रेरणादायक, हेलावून टाकणारे ई. विशेषणांनी सहभागी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाविषयी आपल्या प्रतिक्रिया दिल्या.

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात एका चमूने नांद्यालला भेट दिली. त्या प्रदेशातील ३८ शाळा शिक्षकांसाठी एस. पी. वाय. रेड्डी शाळा येथे एका प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शिक्षण, शिक्षकाची भूमीका, प्राथमिक व माध्यमिक शालेय अभ्यासक्रम, मुल्ये, जीवन आणि त्याचे यथार्थ रुप, गणिताच्या सोबतीने मुल्यांची शिकवण व मनाचे नियमन अशा अनेक विषयांवर चर्चा झाली.

७ सप्टेंबर रोजी अभ्यासींकरिता व्ही. बी. एस. ई. वर एक प्राथमिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या पाठोपाठच २० व २१ सप्टेंबर रोजी एक सर्वसमावेशक असा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला ज्यामध्ये ६५ अभ्यासींनी भाग घेतला. विविध विषयांवरील भाषणांव्यतिरिक्त अभ्यासींना विविध मुल्यांवर आधारित खेळ, छोटा नाट्यप्रयोग, गायन यासाठी देखिल प्रोत्सहित करण्यात आले. शाळांशी कशा प्रकारे संपर्क साधायचा व व्ही. बी. एस. ई. कार्यक्रमाबद्दल माहिती द्यायची या विषयी त्यांना सुचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे व्ही. बी. एस. ई. चे कार्यक्रम कसे आयोजित करावे व त्यानंतरची पूरक कामे कशी करावी या विषयी माहिती देण्यात आली.

दि. २८ सप्टेंबर रोजी ई व एल ग्रुपच्या शाळांमधील शिक्षकांसाठी व इतरांसाठी विभागीय आश्रमात व्ही. बी. एस. ई. वर एक मेळावा आयोजित करण्यात आला. सहभागी शिक्षकांना आपल्या आश्रमातील वातावरणाचा अनुभव घेता आला तसेच काही जणांनी असेही विचार व्यक्त केले की या सत्रामुळे त्यांच्या जीवनामध्ये बदल घडून आला आहे आणि ज्याप्रकारे ते अभ्यासक्रम आणि मुलांना हाताळत असत त्यातही बदल घडून आला आहे.

## गाझीयाबाद – ऊ. प्र.

स्थानिक विद्यालयातील ७० बी. एड. च्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमाने एक व्ही. बी. एस. ई. कार्यशाळेचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, विभागप्रमुख, व इतर प्राध्यापकांनीही यामध्ये भाग घेतला. यामध्ये मुल्यांचा जीवनामधील गरजेवर भर दिला गेला व ध्यानाद्वारे मनाच्या नियमनाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

आत्म्याचे महत्व व मनाचे शुद्धीकरण, मी कोण आहे, मानवी शरीरातील मनाचे महत्व, आत्म्याशी संपर्क साधण्यासाठी आपण कशाप्रकारे मनाचा ऊपयोग करु शकतो व स्वत:ला कशा प्रकारे जडत्वापासून मुक्त करु शकतो यासारखे विषय यामध्ये समाविष्ट केले गेले. नाट्यरुप सादरीकरणाद्वारे हे सिद्धांत आपल्या आचरणात कसे आणता येतील ते सादर करण्यात आले.

सहजमार्ग ध्यान पद्धती व मिशनविषयी संक्षिप्त माहिती दिली गेली. ५ मिनिटे प्रार्थना करुन या सत्राचा समारोप करण्यात आला. या सत्रादरम्यान शिक्षक व विद्यार्थी या दोघांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे आयोजन भगिनी चंद्रकांता व बंधु अंकूर यांनी केले होते.

## रांची येथे मुल्याधारित आध्यात्मिक शिक्षण

### सेंट अलॉयशियस स्कूल

२ सप्टेंबर रोजी शाळेच्या सभागृहात निबंध स्पर्धेनिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाळेतील बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना विनाव्यत्यय या कार्यक्रमामध्ये भाग घेता यावा म्हणून त्या दिवशी शाळेने सुट्टी जाहीर केली होती. कार्यक्रमाचे उदघाटन बंधु अरुणकुमार लाल व शाळेचे मुख्याध्यापक बंधु सिल्वेस्टर सुरीन यांनी केले. शाळेचे भूतपूर्व विद्यार्थी बंधु मनोज तिवारी यांनी मिशन, सहजमार्ग स्मृती फाऊंडेशन, सहजमार्ग रिसर्च अ‍ॅन्ड ट्रेनिंग इन्स्टीट्यूट व त्यांच्या पुढाकाराने चालणारे मुल्याधारित आध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम या विषयांची पूर्वपिठीकेसह ओळख करुन दिली.

अभ्यासी बंधु भगिनींद्वारे संचलीत हे सत्र संपल्यानंतर बंधु गिल्बर्ट पिंटो एस जे यांनी समारोपाचे भाषण केले तसेच मिशनचे व मिशनच्या रांची केन्द्राच्या अभ्यासींचे या चर्चासत्राबद्दल आभार मानले. त्यांना हे बघून विशेष आनंद झाला की शाळेचे माजी विद्यार्थ्यांना अजूनही शाळेच्या वर्तमान विद्यार्थ्यांबद्दल काळजी आहे.

### ऊर्सुलाइन स्कूल

सेंट अलॉयशियस स्कूलमध्ये संपन्न झालेल्या व्ही. बी. एस. ई. कार्यक्रमाचीकिर्ती ऐकून ऊर्सुलाइन सिस्टर्स यांनी बंधु मुकेश तनेजा यांना बोलावून घेतले व सेंट अलॉयशियस सारखेच एक सत्र ऊर्सुलाइन कम्युनिटी ऑफ टीचर्स यांच्यासाठी घेण्याची विनंती केली.

दि. २७ सप्टेंबर रोजी ही कार्यशाळा सुमारे १०० शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली. ज्यामध्ये बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, आंतर महाविद्यालयीन आणि इतर ऊर्सुलाइन संस्थेतील शिक्षक सहभागी झाले होते. सेंट अलॉयशियस शाळेकडून मिळालेल्या प्रतीसादाच्या आधारावर हा कार्यक्रम अधिक सुटसूटीत, मनोरंजक, आणी शिक्षकांशी जास्तीत जास्त संवाद साधणारा बनविण्यात आला.

किमान दोन शाळांशी असणारी मुल्याधारित आध्यात्मिक शिक्षणाविषयीची प्रतिबद्धता आता नियमित रुपात सुरु झाली यामुळे एस. आर. सी. एम. ला गुरुदेवांचे कार्यक्रम जनसामान्यांपर्यंत नेण्याचे व तरुण विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मुल्यांमध्ये विशेष बदल घडवून आणण्याची संधी मिळाली.



## बरौनी – बिहार

दि. २९ सप्टेंबर २००८ रोजी बरौनीतील अभ्यासी, शिक्षक व मुलांसाठी एका मुल्याधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पटना केंद्राचे डॉ. विजयकुमार यांनी या विषयाचा परिचय उपस्थितांना खालील मुद्यांद्वारे करुन दिला. १: वर्तमान शैक्षणिक संरचनेमध्ये मुल्यांचे स्थान २: मुलांना मुल्याधारित शिक्षण देण्यासाठी वापरण्यात येण्याऱ्या विविध पद्धती. धनबादच्या भगिनी दिप्ती यांनी प्रयोगाद्वारे मुलांना कशाप्रकारे मुल्याधारित शिक्षण देता येते याचे प्रात्यक्षिक दाखवले.

## ओपन हाउस कार्यक्रम

### बरौनी रिफायनरी – ट्रेनी इंजीनियर्स

२० सप्टेंबर २००८ रोजी तणाव व्यवस्थापन व स्व विकास या विषयावर आय. ओ. सी. एल. च्या तीस उमेदवार अभियंत्यांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास शुद्धीकरण प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बंधु प्रबोध सिंघवी यांनी ध्यानाद्वारे तणाव व्यवस्थापन यावरील चर्चेचे नेतृत्व केले. " ध्यानाची स्व विकासात असणारी उपयुक्तता" या विषयावर डॉ. जी. एम. भटनागर यांनी सहजमार्ग पद्धतीचे साधन स्व विकासासाठी कशाप्रकारे मदत करते यावर प्रकाश टाकला. या कार्यशाळेप्रसंगी बेगुसराय व ईतर केंद्रांवरील अभ्यासी मोठया संख्येने उपस्थित होते.

### रामनगर – उत्तराखंड

वनसंरक्षक बंधु एन. व्ही. सिंग यांच्या आमंत्रणावरुन आयोजित केलेल्या ओपन हाउस कार्यक्रमास वन विभागातील सुमारे ५२ कर्मचारी उपस्थित होते. "आध्यात्माची हाक" या विषयावरील मिशनच्या प्रशिक्षकांचे संबोधन अतिशय शांतपणे व लक्षपूर्वक ऐकले गेले. त्यानंतर झालेल्या संवादातून प्रेक्षकांचा सहजमार्गाबाबत अधिक जाणून घेण्याबाबतचाउत्साह दिसून येत होता.

### उज्जैन

५ ऑक्टोंबर रोजी केन्द्रातील बंधु आणि भगिनींनी आमंत्रित केलेले सुमारे ११० अध्यात्मिक साधक हजर होते. ओपन हाउसची सुरुवात "मानवी जीवनाचे ऊद्दिष्ट" आणि "साधनेचे मुलतत्व" या दोन भाषणांनी झाली. बंधु संजय खंडेलवाल "मास्टर आणि मिशन" या विषयावर बोलले. कार्यक्रमाच्या अखेरीस बंधु विकल्प मुंदरा आणि बंधु वाय. जी. जोशी यांनी श्रोत्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. सुमारे ८० आमंत्रितांना हा कार्यक्रम आवडला व त्यांनी एस. आर. सी. एम. मध्ये प्रवेश घेण्याची इच्छा प्रदर्शित केली.

### अहमदाबाद




"ध्यानाद्वारे मनाचे व्यवस्थापन" हा विषय होता २८ सप्टेंबर रोजी झालेल्या ओपन हाउस कार्यक्रमाचा. अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना यासाठी आमंत्रित केले गेले होते. या कार्यक्रमाची सांगता काही तरुण विद्यार्थ्यांच्या अभ्यासी बनण्यामुळे यशस्वीरित्या झाली.

तणाव व्यवस्थापनावर एक सादरीकरण, विस्तीर्ण अशा निरमा विद्यापीठाच्या प्रांगणात तेथील प्राध्यापकांसाठी करण्यात आले. तणाव यशस्वीरित्या हाताळण्यासाठी व ऊपयुक्तता व परिणामकारकता वाढवण्यासाठी रामबाण औषध म्हणून ध्यानाची गरज आहे यावर भर दिला गेला. या कार्यक्रमामुळे उपस्थित प्राध्यापक खूपच प्रभावीत झाले व त्यांनी कार्यक्रमाच्या वक्त्यांना जे की मिशनचेच कार्यकर्ते होते, स्थापना दिवस समारोहाचे आमंत्रण दिले व तेथील विद्यार्थ्यांना संबोधित करण्याची विनंती केली.

### बी. एच. ई. एल. – हैद्राबाद

२० सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यक्रमात सेंट झेवीयर्स पी जी कॉलेज आणी राव इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स या संस्थांमधील ७५ विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमाची संकल्पना होती "मनाच्या नियमनाकरिता ध्यान". उपस्थितांना मिशनची उद्दिष्टे, युवकांकरिता ध्यानाचे महत्व, व्यक्तिगत बदलाची संकल्पना जी शेवटी सामाजिक बदलात परावर्तित होते या विषयी माहिती दिली गेली. काही खेळ, प्रश्नोत्तरे तसेच गुरुदेवांच्या भाषणांच्या काही ध्वनीचित्रफ़ीती यांद्वारे या सत्रात माहिती दिली गेली.

सहभागी झालेल्यांपैकी ३० जणांनी साधनापद्धतीमध्ये आवड दाखवली व प्रथम सिटींग घेण्याची तयारी दाखवली. सध्या आपण 'भेल'च्या स्थानिक केंद्राद्वारे या सर्वांशी संपर्क साधून आहोत.

### सिबसागर – आसाम



२० सप्टेंबरला बंधु सुधीर भारतीया यांच्याद्वारे दोन ओपन हाउस कार्यक्रमांचे सिबसागर जिल्ह्यात आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये जोरहाट, नाझीरा व तिनसुकीया येथील अभ्यासी सामील झाले होते. सकाळच्या सत्रातील आमंत्रित प्रामुख्याने उद्योग जगतातील होते. त्यांच्या बरोबरीने काही पत्रकार व काही शैक्षणीक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. संध्याकाळच्या सत्रादरम्यान ऑइल इंडिया आणि प्लॅंटर्स परिवारातर्फे १७ निमंत्रित उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी ९ जणांनी साधनेस सुरुवात केली.

### मसुरी – उत्तराखंड

देशातील प्रमुख प्रशासनीक संस्थान 'द लालबहादूर शास्त्री नॅशनल अकॅडमी ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन' या मसुरीतील संस्थेमध्ये सहजमार्ग हा झोताखाली होता. एप्रील व मे २००८ मध्ये भारतीय प्रशासनीक सेवेच्या १९९५ च्या तुकडीच्या मध्यक्रम प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये देशभरातील सुमारे ११० अधिकाऱ्यांनी भाग घेतला. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळी गंगटोक सेंन्टरचे बंधु रवींद्र तेलंग व भोपाळचे सचिन सिन्हा यांनी मास्टर, मिशन व मेथड संदर्भात अनेक वेळा उपस्थित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. हे दोघेही आय. ए. एस. चे सभासद आहेत.

"ध्यानाद्वारे समतोल जीवन – एक अध्यात्मिक दृष्टीकोन" या विषयावर औपचारिक सादरीकरण व चर्चासत्र देखील आयोजित करण्यात आले. यासारखेच एक सादरीकरण ३१ मे २००८ रोजी २००७ च्या आय. ए. एस. च्या उमेदवार तुकडीसाठी आयोजित करण्यात आले. श्रोत्यांनी योगा, ध्यान व त्याचे मानवी मुल्यांवर होणारे चांगले परिणाम, तणाव व्यवस्थापन जे नंतर आपोआपच समतोल जीवनामध्ये परावर्तित होते, या सर्व गोष्टींमध्ये खुपच आवड दाखविली. दोन महिन्यांच्या दिर्घ प्रशिक्षण कालावधीत एकूण २१ अधिकारी व त्यांचे ५ परिवारजन, ज्यामध्ये श्रीलंकन प्रशासनीक सेवेचा एक अधिकारी देखील सामील होता, यांनी प्रथम सिटींग घेउन ध्यान करण्यास सुरुवात केली. येथे अनेक सत्संग देखील आयोजित करण्यात आले ज्यापैकी एक तर ३० एप्रिल रोजी बाबूजी महाराजांच्या वाढदिवशीच होता. यापैकी काही अभ्यासी देहरादुन आश्रमातसुध्दा सत्संगासाठी नियमित उपस्थित रहात असत. एका संदेशामध्ये गुरुदेवांनी नवीन आलेल्या सर्वांचे स्वागत केले व त्यांना आशीर्वाद दिले तसेच मिशनच्या स्थानिय कार्यकर्त्यांना त्यांच्याकडे लक्ष देण्यास सांगितले.

## उत्तर कर्नाटक

### वाडी येथे ओपन हाउस

१७ ऑगस्ट रोजी रेल्वे कॉलनी मजदूर युनियन हॉलमध्ये एक कार्यक्रम आयोजित केला गेला ज्यामध्ये सुमारे २० साधक उपस्थित होते. यापैकी बहुतांश रेल्वे कर्मचारी होते. मुख्य भाषण डॉ. गजेन्द्र सिंग यांनी हिन्दीतून दिले. ते सहजमार्गाच्या अनेक अंगांबाबत बोलले व अतिशय साध्या व सरळ भाषेत त्यांनी श्रोत्यांना समजावून सांगितले. बंधू राजु काशमपूरकर हे सहजमार्गाच्या सुक्ष्म अंगांविषयी बोलले. वाडीचे प्रशिक्षक बंधू कृष्णराव देशपांडे यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. यानंतर एक उत्साहवर्धक चर्चासत्र पार पडले या दरम्यान ५ ते ६ जणांनी साधना सुरु करण्याबाबत अनुकूलता दर्शवली.

### चितापूर

दि. २४ ऑगस्ट रोजी चितापूरच्या विठ्ठल मंदिरामध्ये एक कार्यक्रम आयोजित केला होता ज्यामध्ये सुमारे ५० स्थानिक रहिवाश्यांनी भाग घेतला. बंधु राजू काशमपूरकर यांनी गुरुदेव व मिशन संबंधी कानडी भाषेतून माहिती दिली. त्यानंतर डॉ. गजेन्द्रसिंग यांनी हिंदीतून मानवी जीवनाचे खरे ध्येय व सहजमार्ग साधनापद्धती याविषयी विस्ताराने माहिती दिली. शेवटी बंधू के. नारायण राव यांनी कानडी भाषेमध्ये आध्यात्मिक साधना लवकरात लवकर सुरु करण्याची गरज यावर आपले विचार मांडले. सर्व उपस्थितांनी ही सर्व भाषणे अतिशय लक्षपूर्वक ऐकली व शेवटी प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले. कार्यक्रमाचा समारोप चितापूरचे प्रशिक्षक बंधू मधूकर राव नाईक यांनी आभार प्रदर्शन करुन केला.

### गुलबर्गा येथे घरगुती मेळावा

बंधू महेश देशपांडे यांच्या घरी ऑगस्ट महिन्यामध्ये एक मेळावा आयोजित करण्यात आला यामध्ये सुमारे २० ते २५ वयोगटातील सुमारे १० जणं उपस्थित होते. डा. गजेन्द्रसिंग हे कानडी भाषेत बोलले तर बंधू श्रीकांत जोशी यांनी हिन्दी भाषेतुन विचार मांडले. यावेळी सहजमार्ग साधनापद्धतीचा साधेपणा व परिणामकारकता या दोन्ही वक्त्यांद्वारे अधोरेखीत झाले. श्रोत्यांनी दोन्ही भाषणे अतिशय लक्षपूर्वक ऐकली व शेवटी काही प्रश्नदेखील विचारले. श्रोत्यांचा प्रतिसाद अतिशय चांगला होता व संपूर्ण कार्यक्रमादरम्यान गुरुदेवांचे अस्तित्व सुक्ष्म अध्यात्मिक वातावरणाद्वारे जाणवत होते.






### कोप्पल

बंधु जी. एस. कामत व बंधू राजू काशमपूरकर यांनी सुमारे २५ जणांच्या समुहास आपल्या मिशनची ओळख करुन दिली. यानंतर येलबर्गा व कोप्पलच्या लहान मुलांनी एक छोटासा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यानंतर लगेचचं "आपल्या साधनेत प्रगती कशी करावी" व "आपल्या केंद्राच्या प्रगतीची गती कशी वाढवावी यावर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित श्रोत्यांचे १० गटात विभाजन करण्यात आले. प्रत्येक गटनेत्याने आपल्या गटातील अभ्यासींनी व्यक्त केलेल्या मतांचा सारांश सांगितला. या संपूर्ण दिवसभराच्या कार्यक्रमात कोप्पल, गंगावती, बेल्लारी, कंपलीकोट्टल, येलबर्गा व हुबळी अशा विविध केन्द्रांमधून १३० अभ्यासी सामील झाले होते. या कार्यक्रमामुळे लाभान्वित झाल्याची भावना सर्वच अभ्यासींनी व्यक्त केली.

## निबंध लेखन



संयुक्त राष्ट्र संघटना व श्री रामचंद्र मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा, महाविद्यालये आणि देशातील सर्व एस. आर. सी. एम. आश्रमांमध्ये संयुक्त राष्ट्र युवक दिनानिमित्त निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट लहान मुले व युवकांच्या मनावर मुल्ये ठसविणे आणि त्यांच्यातील विपुल ऊर्जा, उत्साह, आदर्शपणाला व मनाच्या खुलेपणाला विधायक वळण देणे होते.

या कार्यक्रमात १० ते २४ वयोगटातील जवळपास २५००० मुले व युवक सामील झाले होते. या सगळ्यांचे निबंध सध्या तपासले जात आहेत. वयोगट १० ते १६ या लहान वयोगटातील मुलांनी "धैर्य हेच सत्य" या विषयावर निबंध लिहीला. १७ ते २४ या मोठ्या वयोगटातील युवकांसाठी विषय होता "आत्मसन्मान व आत्मविश्वास हे चरित्र निर्माणास आकार देऊ शकतात". इंग्रजी बरोबरच इतर काही भारतीय भाषांमधून हे निबंध लिहिण्यात आले. या प्रसंगी मुलांनी निबंध नुसते लिहिलेच नाही तर त्यांनी त्याचा पूरेपूर आनंद देखील घेतला. मिशनच्या स्वयंसेवकांनादेखील यातून खुप काही शिकावयास मिळाले. या स्पर्धेमध्ये देशाच्या सर्व भागातून विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. अगदी डून स्कूल पंचकूला व उत्तरेकडील पंजाब विद्यापीठापासून ते दक्षिणेकडील असंख्य शाळांनी यामध्ये भाग घेतला. रांची मधल्या शाळांमधून तर सुमारे ६५०० विद्यार्थ्यांनी हिन्दी व इंग्रजीमध्ये निबंध लेखन केले. जमशेदपूर, धनबाद, बोकारो, रामगढ, लालपनीया, पटना, सिंदरी या सारख्या अनेक केंद्रांवर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.


कर्नाटक मधील शिमोगा येथे इ. ५ वी ते १० वी च्या ५० अंध मुलांनी सुद्धा यामध्ये भाग घेतला. ही मुले आपल्या निबंधांचा मजकूर सांगत होती व आपले स्वयंसेवक ते लिहून घेत होते.

या निबंध स्पर्धेमुळे स्वयंसेवकांना देखील आपल्या आयोजन कौशल्यामध्ये सुधार करण्याची संधी मिळाली. या स्पर्धेमुळे केंन्द्रांनी देखील मोठ्या प्रमाणात अभ्यासींना चेतना देऊन प्रोत्साहित केले. याच अभ्यासींनी पुढे संस्थांशी संपर्क साधणे व स्पर्धेदरम्यान पर्यवेक्षण करणे, निबंध तपासणे यासारख्या महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. विविध शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी या स्पर्धेसाठी दाखवलेला उत्साह आम्हांस विस्मयचकीत करुन गेला. यापैकी अनेकांनी ध्यान व सहजमार्ग साधनापद्धतीची चौकशी केली व त्यापैकी काहींनी साधना सुरु करण्याची तयारी दाखवली. या निबंध स्पर्धेचा निकाल नोव्हेंबरच्या शेवटी येणे अपेक्षित आहे. प्रत्येक वर्गातील हिन्दी व इंग्रजी भाषेतील प्रथम तीन सर्वोत्कृष्ठ निबंधांना चषक देऊन गौरवण्यात येईल. इतर भाषातील तीन सर्वोत्कृष्ठ निबंधांना पूस्तके देऊन गौरवण्यात येईल. ६०% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या सर्वांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येइल.

एस.आर.सी.एम

# एकोज इंडिया


नोव्हेंबर २००८ खाजगी वितरणासाठी खंड १ अंक ६



## प्रकाशाची केन्द्रे

### आणखी एक प्रकाशकेंद्राची निर्मिती – सेवाश्रम, तिरुवनंतपूरम







केरळची राजधानी असलेल्या तिरुवनंतपूरम शहरास अरुविक्करा धरणाजवळच एका सुंदर जागा आश्रमासाठी आशिर्वादरुपाने मिळाली. येथे आठवते की, अनेक वर्षापूर्वी पूजनीय गुरुदेवांनी बाबूजी महाराजांसमवेत त्या वेळच्या त्रावणकोरच्या महाराजांचे अतिथी म्हणून या शहराला भेट दिली होती. त्यावेळी तत्कालीन महाराज व त्यांच्या राजपरिवाराने सत्संगामध्ये भाग देखील घेतला होता. अरबी समुद्र व पश्चिम घाट यांच्यामधील चिंचोळ्या पट्टीमध्ये वसलेल्या या शहरातील अभ्यासी गेल्या एका तपापासून आश्रमाचे स्वप्न पहात होते.१५ एप्रिल २००६ रोजी केरळ व तामिळनाडूमधील काही जवळच्या केंद्रांमधून आलेल्या हजारो अभ्यासींच्या उपस्थितीत पू. गुरुदेवांनी आश्रमाची पायाभरणी करुन जणू या सर्वांच्या प्रार्थनेला प्रतिसादच दिला आहे.

१५ एप्रील २००६ हा दिवस त्रिवेंद्रमवासीयांच्या कायम स्मरणात राहील. पायाभरणी झाल्यानंतर पु. गुरुदेवांनी त्याच जागेवर सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर आपले आशिर्वादपर भाषण दिले.

आश्रमाची एकूण जागा ३ एकर आहे व त्याच्या बाजूलाच दोन एकर जागेवर अभ्यासींची निवासी वसाहत उभी आहे. ही जागा रेल्वे स्थानकापासुन १७ कि.मी. तर विमानतळापासुन २५ कि.मी. दूर आहे. शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे अरुविक्करा धरण जवळच आहे. आश्रमाची जागा या धरणाच्या पाणलोट क्षेत्रातच येते व येथे भरपूर झाडे आहेत. येथील वनश्री व निसर्गसौंदर्य एक थरारक अनुभव देतात. पू. गुरुदेवांनी या आश्रमास "सेवाश्रम" हे नाव दिले आहे. हा आश्रम तिरुवनंतपूरम – वेल्लानाड बसमार्गाच्या डाव्या बाजूस वसलेला आहे.

या जागेवर असणाऱ्या एका छोट्याश्या इमारतीचे रुपांतर अस्थायी ध्यानगृहामध्ये करण्यात आलेले आहे. रविवारच्या सत्संगासाठीसुद्धा या जागेचा वापर केला जातो. पू. गुरुदेवांनी आश्रमाच्या आराखडयाला मंजुरी दिली असून सध्या तळघराचे काम जोरात सुरु आहे.

आपल्या गुरुदेवांच्या कथनानुसार आश्रम ही प्रकाशाची केंद्रे आहेत व ते अंधकाराला दूर सारुन तेजाचा फैलाव करतील. आम्ही सर्वजण पू. गुरुदेवांद्वारे या प्रकाशाच्या नवीन केंद्राचे उद्घाटन होण्याची अतिशय अधीरतेने व उत्सुकतेने वाट पहात आहोत आणि आम्हाला खात्री आहे की आता तो दिवस काही फारदूर नाही.

### एस. आर. सी. एम. ओळखपत्र

मिशनमध्ये अभ्यासींना ओळखण्यासाठी दोन प्रकारची ओळखपत्रे दिली जातात.

या दोन्हींपैकी एक ओळखपत्र अभ्यासीकडे असणे आवश्यक आहे.

#### परिचय पत्र

हे कार्ड अभ्यासींना सहजमार्गात प्रवेश केल्यावर दिले जाते. याची वैधता ही जारी केल्यापासुन एक वर्षापर्यंत असते. हे कार्ड प्राप्त करण्यासाठी अभ्यासीने इन्ट्रोडक्टोरी फॉर्म भरुन आपल्या प्रशिक्षकाकडे देणे आवश्यक आहे.

#### अभ्यासी कार्ड

हे ओळखपत्र अभ्यासीला किमान सहा महिने नियमित साधना केल्यावरच मिळू शकते.

हे कार्ड मिळवण्यासाठी

–अभ्यासीकडे परिचय पत्र असणे आवश्यक आहे.
–अभ्यासीने किमान सहा महिने नियमित साधना केलेली असली पाहीजे.
–प्रशिक्षकाचे शिफारसपत्र आवश्यक आहे.
–हे ओळखपत्र हरवल्यास वा खूप जुने झाल्यास नवीन ओळखपत्रासाठी आवेदन करता येते.

या शिवाय इतर कुठलेही ओळखपत्र चालणार नाही. यासंबंधीचे अर्ज करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी अभ्यासी लोकल मेंबरशिप को ऑर्डिनेटरकडे वा केंन्द्र प्रमुखांकडे संपर्क साधू शकतात. लोकल मेंबरशिप कोऑर्डिनेटर हे झोनल मेंबरशिप कोऑर्डिनेटर च्या सहाय्याने कार्य करीत असतात. आपल्या विभागीय प्रमुखांकडे झोनल मेंबरशिप कोऑर्डिनेटरची माहिती मिळू शकते. अधिक महितीसाठी पुढील पत्त्यावर इमेल पाठवावी in.idcard@srcm.org

**To subscribe to this Newsletter please visit http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2008 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
“Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This message may be edited for content and is intended exclusively for the members of SRCM.